# Washim District Police

**Nature of work** :- Recovery of Stolen Property

**Police Station** :- Washim Rural

**Date of Good Work Done :- 02 JUN 2017**

**Brief of the work done :-**

PS Washim rural at Tamsala Sqaure Three Unknown accuse had stopped the Motor cycle of Gokulchand Singrol and still cash Rs. 1150 /- and Mobile phone of Rs. 2000/-. And also these unknown accuse made several rod robbery with same modus operandi. This situation was very much serious that day.

Then Under the Guidance of SP Mokshada Patil Mam a team led by API Ambulkar and afrer continuously searching them and getting their call details finally on dated 1 Jun 2017 Washim Rural Police arrested that three accuse 1.Sanghpal Bharat Kamble Age19, 2.Rahul Rupesh Waghmare Age18, 3.Sachin Dilip Rasal Age18 all live at Bhim Nagar, Washim and they Confess their crimes and recovered five Mobiles & one two wheeler and other stole property from them.

**Image :-**

लोकमत

# वाटमारी प्रकरणातील तीन आरोपी जेरबंद!

**लाखोंचा मुद्देमाल जप्त : तिघेही वाशिम शहरातीलच**

वाशिम : ग्रामीण व शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये जबरी चोरी करणाऱ्या तीन आरोपींचा पोलिसांनी छडा लावला असून, तिघांनाही १ जून रोजी जेरबंद करण्यात आले.

वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीमधील तामसाळा फाट्यावर गोकुलचंद सिंगरोळ यांची दुचाकी अडवून अज्ञात तिघांनी रोख ११५० रुपये व दोन हजार रुपये किमतीचा मोबाइल जबरीने चोरुन नेला होता. त्यानंतर वाशिम शहर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या केकतउमरा मार्गावरील निमजगा परिसरात तोंडगावच्या गोटे नामक दोन युवकांची दुचाकी अडवून त्यांच्याकडून मोबाइल व रोख रक्कम हिसकावून नेली होती. विळेगाव येथील काळंबांडे नामक शिक्षकाला अडवून ३५ हजार रुपये हिसकावून नेले होते. सातत्याने घडणाऱ्या या वाटमारीच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमक्ष उभे ठाकले होते. दरम्यान, ठाणेदार सुनील अंबुलकर यांनी विशेष पथक नेमून मोबाइल लोकेशनवरुन आरोपींचा शोध लावला. यामध्ये पोलिसांनी संघपाल भारत कांबळे (वय १९), राहुल रुपेश वाघमारे (वय १८) व सचिन दिलीप रसाळ (वय १८, तिघेही रा. भीम नगर वाशिम) या तिघांना ताब्यात घेतले. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून, वाटमारीच्या घटनेतील पाच मोबाइल व एक दुचाकी वाहन पोलिसांनी जप्त केले.

(तालुका प्रतिनिधी)

Hello Washim
Page No. 1 Jun 02, 2017
Powered by: erelego.com